Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-4 | Issue-10 | Nov-2014 Available online at www.isrj.org

# "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्पृश्य उध्दाराचे कार्य"

**कदम संतोष तुकाराम**

इतिहास विभाग प्रमुख, एस.बी.आर.कॉलेज, म्हसवड.

***सारांश —*** आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये ज्या ज्या विचारवंतानी, समाज सुधारकांनी, सामाजिक कार्य कर्त्यांनी केलेल्या योगदानामुळेच देशातील महाराष्ट्र राज्य हे आधुनिक व पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. त्यामध्ये म. ज्योतीबा फुले व सवित्रीबाई फुले यांच्यापासून आपणाला सुरुवात करावी लागेल. पुढे त्यांच्याच सामाजिक कार्यांचा म.वि.रा.शिंदे, पंडीता रमाबाई, न्या.रानडे, गो.ग.आगरकर, सयाजी गायकवाड महाराज, राजर्षी शाहू महाराजांचा आपल्याला अग्रक्रमाने विचार करावा लागतो. पुढे हाच वैचारिक वारसा व मानव मुक्तीचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण हयातभर केले.

## *प्रस्तावना :-*

### पूर्वायुष्य :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म भिमाबाई व रामजी सपकाळ या दांपत्याच्या पोटी दि. १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील इंदौर जवळील महू या गावी झाला.[१] सुभेदार रामजी मालोजी सपकाळ यांचे मूळ गाव कोकणातील दापोली जवळील आंबावडे असल्याने त्यांचे आंबावडेकर असे आडनाव रुढ झाले होते. लष्करातून सेवानिवृत्त झाल्यावर रामजी आंबावडेकरांनी आपले कुटूंब दापोली येथे हलविले. रामजी आंबावडेकरांना शिक्षणाविषयी आवड व आस्था असल्याने त्यांनी आपल्या घरातील मुलांना व महिलांना देखील शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. दापोली येथील प्राथमिक शाळेत बाबासाहेबांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा झाला. सन १८९६ मध्ये रामजींनी आपले कुटुंब सातारा येथे हलविले. सातारा येथील प्राथमिक शाळेत बाबासाहेबांचे प्राथमिक शिक्षण सुरु झाले. इयत्ता २ री मध्ये असताना त्यांच्या शिक्षकांनी बाबासाहेबांचे आंबावडेकर नाव बदलून आंबेडकर असे केले. सातारा येथे ४ -५ वर्षे अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीत बाबासाहेबांनी कुटुंबियांसह लोकांची लाकडे फोडणे, सडकेवर खडी फोडणे यासारखी कष्टाची कामे करुन उदरनिर्वाह चालविला होता. त्यांना पोटभर अन्न व अंगभर वस्त्र देखील निट मिळत नव्हते. शाळेत गेल्यावर

पिण्यासाठी पाणी मिळत नसे. अस्पृश्यांची मुले म्हणून शिक्षकाने त्यांना संस्कृत शिकविण्यास नकार दिल्याने बाबासाहेबांना पर्शियन भाषा शिकावी लागली. पुढे इंग्रजी शिक्षणासाठी ते मुंबईस गेले व हायस्कुलमध्ये शि□ लागले. मुंबईतही अनेक अडचणींना तोंड देत बाबासाहेबांनी अभ्यास करुन सन १९०७ मध्ये मॅट्रिकची परीक्षा पास झाले.[२] तर ते सन १९१२ मध्ये अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची सन १९१२ मध्ये बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

**नोकरी व उच्चशि□□ण :-**

बी.ए. झाल्यावर बाबासाहेबांनी बडोदा संस्थानात काही काळ नोकरी केली. बडोदा संस्थानची शिष्यवृत्ती मिळवून ते जुलै १९१३ मध्ये उच्चशिक्षण घेण्यासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात गेले व जून १९१५ मध्ये राज्यनिती, तत्वाज्ञान, समाजशास्त्र, अर्थशास्त्र व मानसशास्त्र हे पाच विषय घेऊन एम.ए.पदवी प्राप्त केली. नंतर त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून जून १९२१ मध्ये एम.एस्सी परीक्षा पास केली तर दि. २८ जून १९२२ मध्ये ग्रेजईन (लंडन) मधून 'बॅरिस्टर' ही कायद्याची पदवी मिळविली.[३] ऑक्टोबर १९२२ मध्ये आंबेडकरांनी 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवीसाठी 'दि प्रॉब्लेम ऑफ रुपी' हा प्रबंध लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सला सादर केला. पुढे जून १९२७ मध्ये बाबासाहेबांनी कोलंबिया विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त केली. दि. ५ जून १९५२ मध्ये त्यांना कोलंबिया विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ लॉ' पदवी बहाल □ली. तर दि. १२ जानेवारी १९५३ मध्ये उस्मानिया विद्यापीठाने 'डी.लिट' पदवी बहाल □ली.[४] या उच्च पदव्या मिळविण्यासाठी बाबासाहेबांनी कठोर परिश्रम घेतले होते.

**महार वतन :-**

सन १८७४ सालच्या महान वतनाच्या सुधारणा कायद्यात सुधारणा करण्यासाठी त्यांनी विधीमंडळात असताना एक विधेयक मांडले ही महार वतने नष्ट करण्यास आवाहन केले. याविषयी विचार मांडताना आंबेडकर म्हणाले, महारांची मिळकतीची दोन साधने आहेत. पहिले साधन इनाम म्हणून मिळालेली जमीन व दुसरे बलुता म्हणून वतनदार महारांना गावकऱ्यांकडून मिळणारा दाणागाटा पैकी वतनी जमिनी महारांना प्राचीन राज्यकर्त्यांकडून मिळालेल्या आहेत पण या महार वतनदारांच्या जमिनीत तसूभरही भर पडलेली नाही किंवा वेतनात वाढ झालेली नाही म्हणून आंबेडकरांनी ही वतनेच नष्ट करण्याचे आवाहन केले.[५]

**अस्पृश्याच्या हक्कासाठी संघर्ष :-**

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी केलेली सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे त्यंनी आपल्या अस्पृश्य बांधवांना अन्यायाचा प्रतिकार करण्यास आणि न्याय हक्कांसाठी संघर्ष करण्यास शिकविले. अस्पृश्य देखील याच देशाचे नागरीक आहेत. आणि या देशावर इतर कोणाही इतकाच अस्पृश्यांचाही अधिकार आहे असे त्यांनी ठणकावून सांगितले. आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्याची जी परिणती झाली ती मोठी उद्बोधक आहे. त्यांच्या पहिल्या पाक्षिकाचे नाव 'मू□-नाय□' असे होते दुसऱ्याचे नाव 'बहिष्कृत भारत' होते तिसऱ्यांचे नांव 'समता' होते चौथ्याचे 'जनता' असे होते. नावे निराळी पण मत, ध्येये व धोरण यात फरक

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-4 | Issue-10 | Nov-2014 Available online at www.isrj.org

नव्हता. 'मू□-नाय□' त्यांनी मूक्याची गाऱ्हाणी मांडली बहिष्कृत भारतात त्यांनी बहिष्कृत भारताचे दर्शन घडविले समतेचा आग्रह धरला जनता ही चळवळीची चौथी अवस्था हिंदू समाजात स्वातंत्र्य, समता नि बंधुता या तत्वावर एकरुप व्हायची अस्पृश्य समाजाची इच्छ त्यांनी प्रकट केली.[६] या दोषांचे निराकरण करुन अस्पृश्यांची सामाजिक व धार्मिक गुलामगिरी यांतून मुक्तता करण्यासाठी एक चळवळच उभारली.

**महाड येथील चवदार तळयांचा सत्यागृह :-**

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये अस्पृश्यांना उच्चवर्णीयांच्या तळयांमध्ये, आडामध्ये किंवा विहिरीमध्ये पाणी भरण्याचा अधिकार नव्हता. कारण जर अस्पृश्य व्यक्तीने तळयामधील पाणी पिले किंवा हंडयामध्ये भरले तर उच्चवर्णीयांना त्यांचा विटाळ होत असे. त्यामुळे अस्पृश्यांसाठी गावाबाहेर त्यांचा समूह राहत असे त्याठिकाणी त्यांची पाण्याची व्यवस्था त्याच परिसरात केलेली असे. पण कायद्याने सार्वजनिक ठिकाणी जाण्यास अस्पृश्यांना मनाई नव्हती तरी पण जे वर्चस्व समाजामध्ये उच्चवर्णीयांचे होते ते लक्षात घेता महाडमधील अस्पृश्य चवदार तळयावर जात नव्हते. त्यांच्यातील ही मानसिक आत्मविश्वासाची उणीव भरुन काढयासाठी बाबासाहेबांनी बहिष्कृत हितकरिणीची सभा मार्च १९२७ मध्ये महाड येथे आयोजित केली. दि.२० मार्च १९२७ रोजी चवदार तळयावर आपल्या बहुसंख्य अनुयायांसह त्यंनी सत्याग्रह करुन तेथील पाणी वापरण्याचा अधिकार बजावला.[७] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या मनात आत्मविश्वास व नवीन प्रेरणा निर्माण करण्याचे □ांतिकारी कार्य केले.

**मनुस्मृतीचे दहन :-**

मनुस्मृती या धर्मग्रथांच्या माध्यमातून सामाजिक विषमतेला पोषक वातावरण निर्माण केले जात होते. अस्पृश्यांना त्यांच्या मानवी हक्कांपासून दुर ठेवून त्यांना गुलाम म्हणून वागविण्यात येत होते. दास्यांच्या गुलामगिरीच्या श्रृंखला त्यांच्या पायात बांधल्या होत्या. वर्ण व्यवस्था बळकट करण्याचा प्रयत्न केला जात होता. स्त्रियांना व शुद्रांना गुलाम बनविण्यात आले होते. त्यांच्यावर अनेक बंधने लादण्यात आलेली होती. ही चातुर्वर्ण्य, विषमतावादी व्यवस्था नष्ट करण्यासाठी बाबासाहेबांनी दि.२५ डिसेंबर, १९२७ रोजी जाहिररित्या मनुस्मृतीचे दहन केले.[८]

**□ाळाराम मंदिर सत्याग्रह :-**

नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाचे स्थान निवडावयाचे कारण म्हणजे 'राम' हे हिंदूचे पूज्य दैवत आहे. व प्रत्येक हिंदूच्या हृदयात रामाला स्थान आहे या दृष्टीने रामाच्या मंदिरात, प्रवेश सत्याग्रह करावा म्हणजे बाकीच्या मंदिरांचा प्रश्न आपोआप सुटेल आणि त्या बरोबर हिंदूच्या मनात यथायोग्य बदलही होईल असा त्यामागील उद्देश होता. डॉ. बाबासाहेब यांच्या नेतृत्वाखाली (कर्मवीर दादासाहेब गायकवाड) यांच्या सहकाराने नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाचा निर्णय ठरला. नाशिक काळराम मंदिर प्रवेश सत्याग्रह डॉ.बाबासाहेब यांच्या नेतृत्वाखाली दि. ३ मार्च १९३० रोजी सत्याग्रह सुरु झाला.[९] व हा सत्याग्रह सुमारे

५-६ वर्षे चालला होता. हे या सत्याग्रहाचे वैशिष्टये होते. थोडक्यात सन १९३० पासून १९३५-३६ साला पर्यंत हा प्रवेशाचा सत्याग्रह चालवला परंतू अस्पृश्यांना रामाच्या मंदिरात प्रवेश मिळू शकला नाही. [१०]

**जातीय निवाडा :-**

लंडन येथील गोलमेज परिषदेत जातीय प्रश्नावर तोडगा होऊ शकला नाही. म्हणून जातीय प्रश्नावर ब्रिटनचे पंतप्रधानांनी दि. १७ ऑगस्ट १९३२ रोजी जातीय निवाडा जाहिर केला या जातीय निवाडयाद्वारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या (खलित्यातील) मागणीनुसार ब्रिटिश सरकारने अस्पृश्य वर्गाला स्वतंत्र मतदार संघ दिला आणि याशिवाय सर्व मतदार संघामध्येही त्यांना मताचा अधिकार दिला.[११]

**बौध्द धम्माची दिक्षा :-**

हिंदू धर्मात वर्षानुवर्षे अस्पृश्य समाजातील माणसांना अत्यंत हीन दर्जाची व अपमानास्पद वागणूक दिली जात होती. माणूस म्हणून त्यांना बरोबरीने वागविले जात नव्हते. ही गोष्ट बाबासाहेबांना खूप खटकत होती. त्यांनी सन १९२७ पासून हिंदू धर्मियांचे हृदयपरिर्वतन करण्याचे प्रयत्न केले. त्याच महाडच्या चवदार तळयावरील सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेशासाठी सत्याग्रह, अमरावती येथील अंबादेवीच्या मंदिराचा सत्याग्रह इत्यादीचा समावेश होता. बाबासाहेबांनी सन १९३६ पासून धर्मांतर करण्याबाबातचे विचार बोलून दाखविण्यास सुरुवात केली होती. जो धर्म माझ्या सद्सद्विवेकबुध्दीला पटेल, माझ्या मनाची पूर्ण खात्री करुन देईल, त्यावेळी मी माझ्या सात कोटी बांधवांसह सुरक्षिरित्या धर्मांतर करीन आणि त्यांचे जीवन स्थिरस्थावर करीन असे म्हटले हाते. त्यावेळेपासून इस्लाम व ख्रिश्चन धर्माचे प्रतिनिधी बाबासाहेबांना त्यांच्या अनुयायांसह आपल्या धर्मात प्रवेश करावा यासाठी प्रयत्न करीत होते. पण भारतभूमीशी एकनिष्ट असणाऱ्या बाबासाहेबांनी दुसऱ्या देशातील धर्म न स्वीकारता सन १९५६ मध्ये आपल्याच देशातील असणारा व खरा मानव धर्म असणारा, बहुजन लोकांच्या हिताकरिता, सुखाकरिता, प्रत्येक मनुष्यमात्राच्या जीवनाला अत्यंत आवश्यक व पोषक असणारा बौध्द धर्म स्वीकारण्याचा निर्णय घेतला.

भारतात ज्या नागलोकांनी सर्वात प्रथम बौध्द धर्माचा स्विकार व प्रसार केला. त्या नागलोकांची वस्ती नागपूर येथे व आसपास होती. म्हणून बाबासाहेबांनी दिक्षा घेण्यासाठी नागपूरच्या भूमीची निवड केली. येथेच दिनांक १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब व त्यांच्या पत्नी डॉ. सौ.सविता आंबेडकरांनी महास्थवीर चंद्रमणी यांचेकडून बौध्द धम्माची दीक्षा घेतली [१२] व दि. १५ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षा भूमीवर दिक्षा समारंभात ५ लाख अनुयायांना बौध्द धम्माची दीक्षा दिली. अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वर्षा-नुवर्षे वरिष्ठ वर्णियांचा अन्याय, अत्याचार सोसणाऱ्या आपल्या लाखो बांधवांची धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता केली. धर्मातरानंतर दोनच महिन्यात दि. ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ.बाबासाहेबांचे महपरिनिर्वाण झाले.[१३]

**समारोप :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वर्णव्यवस्था/ जाती व्यवस्था, सामाजिक अन्याय वाटत होती. तो एक कलंक वाटत होता. माणसाचे माणुसपण नाकारण्यासाठीच ही प्रथा आहे असे त्यांचे मत होते. ही व□व्यवस्था व

जातीव्यवस्था संपविण्यासाठी त्यांनी मोठी सामाजिक चळवळ उभारली. सत्याग्रह केले. लोकांना एकत्र जमवू-न, संघटीत करुन जनजागृती केली. आज जातीप्रथा कायद्याने नष्ट झाली आहे. अस्पृश्यांचे हक्क कोणाच्या दयेने किंवा याचना करुन मिळवण्यापेक्षा स्वतःच्या प्रयत्नाने आणि लढा देऊनच ते मिळवावेत. त्यासाठी त्यांनी प्रवृतत केले हे या चळवळीतील सर्वांत मोठे योगदान आहे.

आज भारतामध्ये संसद, विधिमंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय आणि निमशासकीय संस्थामध्ये अस्पृश्यांना ज्या राखीव जागा आहेत. त्यांच्यामुळे शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्या आहेत या सर्वांचे श्रेय आजही डॉ. बाबासाहेबांना द्यावे लागेल. आणि यापुढेही ते कार्य अखंड मानव जातीसाठी दीपस्तंभासारखे प्रेरणादायी राहील यात शंका नाही.

**संदर्भसूची**

१. दै. तरुण भारत, दि. ६/१२/२०१२ पान.४
२. कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई २०१२ पान.१६
३. मोरे दिनेश, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के.पक्ष पब्लिकेशन पुणे २००६ पान.३७०,
४. म्हैसकर मनीषा(संपा.), लोकराज्य विशेषांक, माहिती व जनसंपर्क महा.महाराष्ट्र शासन मुंबई २००६ पान.३५
५. गायकवाड सुनिता, डॉ.बाबासहेब आंबेडकर, सुप्रिया प्रकाशन सोलापूर २००८, पान १८ ते २०
६. कीर धनंजय, उपरोक्त, पान १६७
७. दै. पु□प-न□री, दि. २०/३/२०१४, पान ४
८. डॉ. बाचल, वि.मा. व राडकर र.घ., राज्यशास्त्र (mpsc) निराली प्रकाशन, पुणे २००८, पान २४
९. Prof.more Javahar and prof. kale Raje - Treories of identify in Human right and Dr.B.R. Ambedkar thout is international Research volume २०१३ page No.६७
१०. खरात शंकरराव (संपा). डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, इंद्रायणी साहित्य, पुणे १९९०, पान.४२
११. खरात शंकरराव (संपा), बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, इंद्रायणी साहित्य, पुणे १९८७ पान.१६८
१२. पाटणे यशवंत, चैतन्याचे चांदणे, संस्कृती प्रकाशन, पुणे २०१३ पान.४७
१३. दै. गंधवार्ता, दि. १४/४/२०१४, पान.२